DISTRICT MAGISTRATE OSMANABAD

# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

(उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301 फॅक्स क्रमांक 02472-228018

Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.

3. या कार्यालयाचे फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 प्रमाणे मनाई आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी-3/सीआर-26 दि. 21.03.2020.

4. भारत सरकार, गृह मंत्रालय, यांचे आदेश क्र. 40-3/2020-डीएम-1(ए) दिनांक 14 एप्रिल 2020.

5. भारत सरकार, गृह मंत्रालय, यांचे आदेश क्र. 40-3/2020-डीएम-1(ए) दिनांक 15 एप्रिल 2020.

6. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 17.04.2020.

7. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी-3/सीआर-26 दि. 19.04.2020.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26

दिनांकः- 21/04/2020.

**आदेश:-**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 4 व 5 अन्वये भारत सरकारने कोव्हिड 19 या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी संपूर्ण देशात लॉकडाऊनचा कालावधी दिनांक 03 मे 2020 पर्यंत वाढविला आहे. ज्याअर्थी संदर्भ क्र. 5 व 6 अन्वये करोना विषाणूचा (COVID-19) प्रादुर्भाव होऊ याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून लॉकडाऊनचे कालावधीत करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 5 व 6 चे अनुषंगाने संदर्भ क्र. 7 अन्वये या कार्यालयाने आदेश पारित केलेला असून या आदेशातील मुख्य मुद्दा क्र. 14 मध्ये **"वैद्यकीय आणि पशुवैद्यकीय सेवेसाठी आणि जीवनावश्यक वस्तूंच्या खरेदीसाठी व्यक्तींना खासगी वाहनांचा वापर करता येईल. (दुचाकीवर फक्त एकच व्यक्ती असेल आणि चारचाकी वाहनांच्या बाबतीत चालक व मागील आसनावर एक व्यक्ती असेल)"** असे नमूद आहे. तथापि या आदेशाचे अनेक दुचाकीस्वारांकडून उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे लॉकडाऊन व सोशल डिस्टंन्सींगच्या नियमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेकरिता असे गैरकृत्य करणाऱ्या व्यक्तींविरोधात दंडात्मक कार्यवाही करणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे.



Scanned by CamScanner

त्याअर्थी मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हाधिकारी, उस्मानाबाद उपरोक्त वाचा क्र. 2 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार खालील स्वरुपाचे गैरवर्तन करणा-या व्यक्तींविरोधात दंडात्मक व फौजदारी कार्यवाही करण्याबाबत आदेश पारित करीत आहे.

| अ. क्र. | गैरकृत्याचे स्वरुप | गैरकृत्य करताना आढळल्यास करावयाची दंडात्मक कार्यवाही | कार्यवाही करणारा विभाग |
|---|---|---|---|
| 1. | दुचाकीवर चालकाव्यतिरिक्त दुसरी व्यक्ती बसलेली असणे. | रक्कम 500/- रु. दंड | 1. स्थानिक स्वराज्य संस्था (न.प./न.पं./ग्रा.पं.)<br>2. संबंधित शासकीय विभागप्रमुख (कार्यालय क्षेत्रामध्ये)<br>3. पोलीस विभाग |

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती, संस्था अथवा संघटना आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 51 तसेच उपरोक्त वाचा क्र. 2 मधील "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" चे नियम 11 नुसार, भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) कलम 188 मधील तरतुदींनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदर आदेश आदेशाच्या दिनांकापासून दि. 03 मे, 2020 पर्यंत लागू राहील.

(दिपा मुधोळ-मुंडे)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद

**प्रत:-** मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. सर्व विभागप्रमुख, जिल्हा उस्मानाबाद.
4. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
5. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
6. उपविभागीय अधिकारी तथा INCIDENT COMMANDER सर्व जिल्हा उस्मानाबाद.
7. तहसिलदार तथा INCIDENT COMMANDER सर्व जिल्हा उस्मानाबाद.
8. गट विकास अधिकारी, पंचायत समिती सर्व जिल्हा उस्मानाबाद.
9. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद/नगर पंचायत सर्व जिल्हा उस्मानाबाद.
10. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

21/4/20
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद
DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned by CamScanner